

# आवाहन



स.न.वि.वि.

"सेवायाऽमृतश्नुते" ब्रीद स्वीकारलेल्या पुणे सेवासदन संस्थेच्या शैक्षणिक कार्याची नागपूर नगरीत सूरवात २ जाने १९२७ पासून झाली. स्त्री प्रगती व गरजू अनाथ स्त्रियांना मदतीचा हात देउन त्यांना स्वावलंबनाचा मार्ग दाखविणारी, पारतंत्र्य व स्वातंत्र्य यांच्या मधल्या काळात शिक्षणाचे कार्य करणारी एक अग्रणी संस्था!

स्त्रियांच्या ज्ञानकक्षा रुंदावणे, कौटुंबिक सामाजिक व राष्टीय जबाबदारी पेलण्यास स्त्रियांना सक्षम बनविणे, त्यांना स्वयंनिर्भर बनविणे आदी. संस्थेची वैशिष्टये!

समाजातील काही सामाजिक संस्था एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित होउन कालक्रमणा करतात. या प्रवासात कितीही संकटे आलीत तरी विचलित न होता, ध्येयापासून फारकत न घेता उद्दिष्टाप्रत वाटचाल करीतच राहतात. आजच्या व्यापारीकरणाच्या युगातही त्याच ध्येयनिष्ठेने तीच आपली परंपरा राखून स्त्री शिक्षणाचे कार्य करीत ही संस्था शताब्दी वर्षाकडे खंबीरपणे अग्रेसर आहे.

प्रगत स्त्री – शिक्षण व स्त्रियांच्या यशोन्नतीसाठी काही नवीन प्रकल्प संस्थेने हाती घेतलेले आहेत. त्यासाठी आपण आर्थिक योगदान देउन एका सेवाभावी संस्थेला मदत करावी, ही विनंती!

सौ. कांचन नितीन गडकरी
अध्यक्ष
पुणे सेवासदन संस्था, नागपूर